Maharashtra State
Board of Secondary &
Higher Secondary Education, Pune
Survey No. 832-A, Final Plot No. 178 & 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune 411 004. Maharashtra (INDIA)

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं. ८३२-ए, फा. प्लॉ. नं. १७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. महाराष्ट्र (भारत)

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel. Chairman (P) STD. (020)-25651751 | EPABX - 25705000 | Fax : 25665808 | Secretary (P) : 25651750

क्र.रा.मं./ऑनलाईन/कलचाचणी/१४१२
पुणे-४११ ००४
दिनांक :- २२ जानेवारी, २०२०

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :- कलमापन चाचणी व अभिक्षमता चाचणी मुदतवाढीबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,राज्यभरात कलमापन व अभिक्षमता चाचणी दि.२७ डिसेंबर, २०१९ ते दि.१८ जानेवारी, २०२० या २३ दिवसांच्या कालावधीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आणि श्यामची आई फाऊंडेशन, पुणे यांच्यातील सामंजस्य करारानुसार आयोजित करण्यात आलेली होती, हे आपणास विदित आहेच.

तथापि, काही शाळांमध्ये अद्यापही काही विद्यार्थ्यांची सदर कलमापन चाचणी व अभिक्षमता चाचणी झालेली नसल्यामुळे दि.२३ जानेवारी, २०२० ते दि.३१ जानेवारी, २०२० या नऊ दिवसांच्या कालावधीत, आपल्या कार्यकक्षेतील ज्या मान्यताप्राप्त शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांची सदर कलमापन व अभिक्षमता चाचणी घेण्यात आलेली नाही, त्या सर्व उर्वरित शाळांमधील इयत्ता १० वी च्या उर्वरित विद्यार्थ्यांची कलमापन चाचणी व अभिक्षमता चाचणी पूर्ण करून घेण्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळांना कळविण्यात यावे. यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/कलचाचणी / ३०७६
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-२४/०१/२०२०
२७

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

कलमापन चाचणी व अभिक्षमता चाचणी मुदतवाढीबाबतचे राज्य मंडळाचे क्र.रा.मं./ऑनलाईन/कलचाचणी/१४१२ दि. २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.